क्रमांक : ७७

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

### मंगळवार, दिनांक १९ मे, २०२६/वैशाख २९, शके १९४८

७७. सर्व सन्माननीय सदस्यांना याद्वारे कळविण्यात येते की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जेंडर बजेट अंतर्गत महिला व बाल कल्याण योजनेतून आर्थिकदृष्टया दुर्बल कुटुंबातील महिलांना शिलाई मशिन, घरघंटी व मसाला कांडप यंत्रांचे वितरण करण्यात येते, यानुषंगाने सन्माननीय विधानसभा सदस्या डॉ. ज्योती गायकवाड प्रतिनिधित्व करीत असलेल्या मतदारसंघातील गरीब होतकरु महिलांच्या स्वयंरोजगारासाठी जास्तीत जास्त महिलांचे अर्ज सन्माननीय सदस्यांच्या कार्यालयातून भरुन देण्यात आले, परंतु श्री. विनायक विसपुते, सहायक आयुक्त, जी नॉर्थ, बृहन्मंबई महानगरपालिका, मुंबई यांनी सन्माननीय सदस्या ह्या स्थानिक लोकप्रतिनिधी असूनसुध्दा त्यांना विश्वासात न घेता अनेक ठिकाणी महिलांना शिलाई मशिन, घरघंटी व मसाला कांडप यंत्राचे वितरण केल्यामुळे सन्माननीय विधानसभा सदस्या डॉ. ज्योती गायकवाड श्री. विनायक विसपुते, सहायक आयुक्त, जी नॉर्थ, बृहन्मंबई महानगरपालिका, मुंबई यांच्याविरुध्द दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेली विशेषाधिकारभंग व अवमानाची सूचना मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम २८४ मधील तरतूदींच्या अधीनतेने स्वेच्छानिर्णयाने विधानसभा विशेषाधिकार समितीकडे तपासणीसाठी व अहवाल सादर करण्यासाठी दिनांक १५ मे, २०२६ रोजी सुपूर्द केली आहे..

---

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : १९ मे, २०२६

**जितेंद्र भोळे,**
सचिव -१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व मा.सदस्य.
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
५) संगणक कक्ष
६) MKCL कक्ष